# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**चौथा मजला, एक्सप्रेस टॉवर, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.**
**दूरध्वनी : ०२२-२२०२ ६२४९, २२८३ ५२४७, २२०२ ५३५४**
**ई-मेल : ms@mjp.gov.in / headquarters@mjp.gov.in / cao@mjp.gov.in**
**वेबसाईट : www.mjp.maharastra.gov.in**


क्र.मजीप्रा-२०१८/सभा-१४३/(३५)/आ.४/ दिनांक: १४.११.२०१८

**प्रति,**
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दि.१ नोव्हेंबर, २०१८ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४३ व्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

दि.१ नोव्हेंबर, २०१८ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४३ व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

**आपला विश्वासू,**

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.)**

**प्रत :** खाजगी सचिव, मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा, मंत्रालय, मुंबई.
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे निदर्शनास आणावे ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/ नागपूर.

अधीक्षकअभियंता,(मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई यांना त्वरित कार्यवाहीसाठी.

अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) मजीप्रा. ठाणे यांना त्वरित कार्यवाहीसाठी.

अधीक्षक अभियंता, म.नि.स.स. सिडको भवन, नवी मुंबई यांना त्वरित कार्यवाहीसाठी.

व्यवस्थापक तथा उप अभियंता, स्था.मा. कक्ष-९, सिडको भवन, नवी मुंबई यांना त्वरीत कार्यवाहीसाठी.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, यांना त्वरीत कार्यवाहीसाठी.

उप मुख्य लेखाधिकारी (१ / २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता) म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. मुंबई./ सिडको भवन, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्त आपल्या कार्यालयासी संबंधित नमुद केलेल्या कार्यक्रम बाबत निर्णयाप्रमाणे मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांच्या मान्यतेने आवश्यक आदेश निर्गमित करावयाची कार्यवाही ८ दिवसात करण्यात यावी. तसेच इतिवृत्तातील निर्णयाची अंमलबजावणी एक महिन्याचे आत करुन त्याबाबतचा अहवाल मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४३ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४३ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.बबनराव लोणीकर यांचे अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी दुपारी १.३० वाजता त्यांचे मंत्रालयीन दालन क्र.५०३, पाचवा मजला, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य तसेच प्रतिनिधी उपस्थित होते.

१) मा.श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.सदाभाऊ खोत, राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष,
३) मा.श्री.शामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४) मा.श्री.पी. वेलरासू, सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.
५) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे प्रतिनिधी
६) प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे प्रतिनिधी श्री.यशवंत बुधवंत, कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, (उर्जा) उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे प्रतिनिधी श्रीमती. कविता के. तोंडे, कक्ष अधिकारी, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.वाय.बी.पाटील, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.अशोक मांडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.) म.जी.प्रा. मुंबई.
३) श्री.एस.जी.खडताळे, कार्यकारी अभियंता (मु.) म.जी.प्रा. मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ : म.जी.प्रा. च्या १४२ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १४२ वी सभा दि.११.७.२०१८ रोजी संपन्न झाली. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १४२ व्या सभेच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**कार्यक्रम बाब क्र.२ : म.जी.प्रा.च्या १४२व्या सभेतील निर्णयाप्रमाणे झालेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.**

म.जी.प्रा. च्या संचालक मंडळाची दि.११ जुलै, २०१८ रोजी संपन्न झालेल्या १४२ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४२ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३, ता.पनवेल, जि. रायगड. म.जी.प्रा.ची योजना म्हणून राबविण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत.

सदर प्रकरणी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळास अवगत केली.

वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ मजीप्राची योजना म्हणून राबविण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा. संचालक मंडळाच्या दि.२७ मार्च २०१८ रोजी पार पडलेल्या १४१ व्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आली. त्यात पनवेल महानगर पालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणाऱ्या हिश्याची रक्कम रु.१९५.९६ कोटी इतकी म.जी.प्रा च्या घसारा/स्वनिधी म्हणून उपलब्ध करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

परंतु उपरोक्त संपूर्ण रक्कम मजीप्राच्या घसारा/स्व निधीमधून उपलब्ध करणे शक्य नाही. म.जी.प्रा कडे उपलब्ध असलेला घसारा निधी हा एकून २५ योजनांचा एकत्रित निधी असून त्यातील रक्कम एकाच योजनेकरिता म.जी.प्रा. चा हिस्सा म्हणून उपयोगात आणणे संयुक्तिक ठरणार नसल्याने पनवेल महानगर पालिकेच्या सुधारित पाणी मागणीच्या अनुषंगाने म.जी.प्रा.च्या हिश्याची रक्कम अमृत कार्यक्रमांतर्गत तरतूदीतून प्राप्त करणे प्रस्तावित करण्यात आले आहे.

दरम्यान, मजीप्राची सन २०१८-१९ ची दरसूची (DSR) जून २०१८ मध्ये लागू करण्यात आल्याने योजनेची अंदाजपत्रके व आराखडे अद्यावत करण्यात आली असून, त्यानुसार योजनेची किंमत रु.३६४,११,१८,२३५/- निव्वळ व रु.४०८,७८,८३,४४३/- ढोबळ (९% ईटीपीसह) इतकी येत असून, योजनेच्या रु.३६४,११,१८,२३५/- निव्वळ किंमतीच्या प्रस्तावास मुख्य अभियंता, मजीप्रा, ठाणे कार्यालयामार्फत दि.५ सप्टेंबर २०१८ च्या पत्रान्वये अटी व शर्तीच्या अधीन राहून तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आली आहे.

प्रस्तावित योजनेची ढोबळ किंमत रु.३९२.०५ कोटी (मजीप्रा हिश्श्यातील इ.अॅन्ड पी. वगळून) असून, सहभागी ग्राहकांच्या पाण्याच्या मागणीच्या प्रमाणात वित्तीय सहभागाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| क्र. | ग्राहक संस्था | पाण्याची मागणी (द.ल.लि.) | सहभाग रु.कोटीमध्ये |
|---|---|---|---|
| १. | सिडको | ३५ | ५६.१५ |
| २. | जे.एन.पी.टी. | ४० | ४८.६६ |
| ३. | मजीप्रा (पनवेल मनपा क्षेत्राकरीता) | १०० | १८६.१० |
| ४. | एमएमआरडीए | ५३ | १०१.१४ |
| | **एकूण** | **२२८** | **३९२.०५** |

पनवेल महानगर पालिकेच्या पाणी मागणीच्या (१०० MLD) अनुषंगाने येणाऱ्या हिश्याची रक्कम अमृत कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करणे प्रस्तावित असल्याने अमृत कार्यक्रमा अंतर्गत शासनाच्या नगरविकास विभागाकडून मंजूर होणाऱ्या विविध प्रस्तावांच्या अनुषंगाने मजीप्राच्या हिश्याच्या रकमेमधून भूसंपादन, स्टाफ क्वार्टर, ऑफीस बिल्डींग कामांची तसेच आकस्मिक खर्च व आस्थापना व अवजारे यांची रक्कम वगळून मजीप्राच्या हिश्श्याची रक्कम रु.१७३.२७ कोटी इतकी येत आहे. अमृत कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रु.१७३.२७ कोटी रक्कम पुढीलप्रमाणे उपलब्ध होणार आहे.

**(रुपये कोटी)**

| | केंद्र शासन हिस्सा (५०%) | राज्य शासन हिस्सा (२५%) | मजीप्राचा हिस्सा (२५%) | एकूण |
|---|---|---|---|---|
| अमृत कार्यक्रम | ८६.६३ | ४३.३२ | ४३.३२ | १७३.२७ |

सन २०१८-१९ च्या दरसूचीनुसार तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार मजीप्राच्या हिश्श्याची रक्कम रु.१८६.१० कोटी (मजीप्रा हिश्श्यातील इ.ॲन्ड पी. वगळून) इतकी येत आहे. तथापि, न्हावा-शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ या योजनेमधील मजीप्राच्या हिश्याची रक्कम अमृत कार्यक्रमा अंतर्गत शासनाच्या नगरविकास विभागाकडून मंजूर होणाऱ्या विविध प्रस्तावांच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद कामे वगळता रु.१७३.२७ कोटी इतकी येत आहे. त्यामुळे यामधील फरकाची रक्कम (रु.१८६.१० - रु.१७३.२७ =रु.१२.८३कोटी) मजीप्राने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच मजीप्राची

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

योजना म्हणून राबविण्याच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा २५% म.जी.प्रा.ने भरल्यास सदर योजनेमध्ये म.जी.प्रा.स एकूण रु.१२.८३ + ४३.३२ = रु.५६.१५ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याची चर्चा झाली.

तसेच मा. अध्यक्ष तथा मंत्री पा.पु. व स्वच्छता यांनी , सदर योजनेकरीता पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने आवश्यक रक्कम अमृत कार्यक्रमांतर्गत मंजूर करणे प्रस्तावित असले तरी या योजनेत इतर संस्थांचाहि सहभाग असल्याने, या योजनेची संपूर्ण निविदा कार्यवाही (प्रसिद्धी पासून) म.जी.प्रा. मार्फत करण्यात येऊन निविदेस म.जी.प्रा. च्या प्रचलित धोरणानुसार म.जी.प्रा. निविदा समिती मार्फत मंजुरी घेण्यात यावी. त्याच बरोबर संपूर्ण योजना म.जी.प्रा. मार्फतच राबविण्यात यावी अशा सुचना दिल्या.

उपरोक्त नुसार चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

<u>ठराव :</u> **असा ठराव करण्यात येतो की,**

१. अस्तित्वातील न्हावा शेवा पाणी पुरवठा केंद्रातून सद्य:स्थितीतील ग्राहकांनी त्याचबरोबर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मजीप्राकडे पाण्याची वाढीव मागणी केली असून, त्यानुसार सदरची एकूण पाणी मागणी २२८ द.ल.लि. इतकी आहे. तथापि, अस्तित्वातील न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेचे आयुर्मान संपुष्टात येत असल्याने सदर वाढीव पाणी मागणी पूर्ण करण्याकरीता, प्रस्तावित रु.४०८.७९ कोटी ढोबळ (२२८ द.ल.लि. क्षमता) किंमतीची पाणी पुरवठा योजना राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. "वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ ता.पनवेल, जि.रायगड " या योजनेतील पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणारी रक्कम ही केंद्र शासनाच्या अमृत कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्याचे प्रस्तावित केल्याने व "वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ ता.पनवेल, जि.रायगड" योजना मजीप्राची योजना म्हणून राबवावयाची असल्याने पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणाऱ्या रक्कमेतील स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (पनवेल म.न.पा.) व अमृत कार्यक्रमामध्ये मंजूर न होणारा हिस्सा (४३.३२ कोटी +१२.८३ कोटी) याची रक्कम रु.५६.१५ कोटी मजीप्राकडून घसारा निधीतून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून ( सदर योजनेच्या उत्पन्नातून तेवढी

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

रक्कम पुनःश्च घसारा निधीमध्ये जमा करणेच्या अधीन राहून) उपलब्ध करुन देण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. "वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ ता.पनवेल, जि.रायगड " या योजनेतील पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणारी रक्कम ही केंद्र शासनाच्या अमृत कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात येणार असली तरी, हि योजना वाढीव न्हावा-शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ म्हणून व मजीप्राची योजना म्हणून हाती घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे व सदर योजनेची मालकी कायमस्वरूपी मजीप्राचीच राहणार आहे.

४. अमृत कार्यक्रमांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणाऱ्या रक्कमेस शासन (नगर विकास विभाग) स्तरावर मान्यता देताना ती म.जी.प्रा. ची योजना म्हणून तसेच योजनेची मालकी कायमस्वरूपी म.जी.प्रा.चीच राहणार असल्याबाबत नगर विकास विभागाने शासन निर्णयामध्ये नमूद करणे आवश्यक राहील.

५. सदर योजनेकरीता पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने आवश्यक रक्कम अमृत कार्यक्रमांतर्गत मंजूर करणे प्रस्तावित असले तरी या योजनेत इतर संस्थांचाहि सहभाग असल्याने, या योजनेची संपूर्ण निविदा कार्यवाही (प्रसिद्धी पासून) म.जी.प्रा. मार्फत करण्यात येऊन निविदेस म.जी.प्रा. च्या प्रचलित धोरणानुसार म.जी.प्रा. निविदा समिती मार्फत मंजुरी घेण्यात यावी. त्याच बरोबर संपूर्ण योजना म.जी.प्रा. मार्फतच राबविण्यात यावी .

६. सहभागी ग्राहक संस्थेच्या पाणी मागणीनुसार अंशदानासाठी आवश्यक रक्कम प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक तो करारनामा करण्यात यावा.

७. सहभागी ग्राहक संस्थांशी करारनामा करताना पाण्याचे दर स्पष्टपणे नमुद करावे व शक्यतो सध्याचे प्रचलित दरापेक्षा कमी असू नयेत.

८. सहभागी सर्व ग्राहक संस्थेच्या पाणी मागणीनुसार अंशदानासाठीचा पहिला हप्ता प्राप्त झाल्यावरच योजनेस कार्यादेश देण्यात यावेत.

९. सदरची योजना ३६ महिन्यात पूर्ण करण्याच्या अनुषंगाने योग्य ते नियोजन करण्यात यावे.

यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दैनंदिन देखभाल दुरुस्ती करत असलेल्या पाणी पुरवठा केंद्रांवर व पाणी पुरवठा योजनांवर सौर उर्जा प्रकल्प उभारण्यासाठी मेडा संस्थेला प्रकल्प सल्लागार म्हणून नेमण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणे बाबत.**

सदर प्रकरणी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळास अवगत केली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत २५ पाणी पुरवठा केंद्रे व २५ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची दैनंनि देखभाल दुरुस्ती करण्यात येते. या योजनांवरील यंत्रसामुग्रीचा विचार करता एकुण जोडलेला वीजभार हा सुमारे १९३५४ कि.वॅ. असून यासाठी वापरण्यात येणा-या दैनंदिन वीजेचा वापर सुमारे ३६२ मे.वॅ. युनिटस प्रतिदिन आहे. या वीज वापरावर सुमारे रु.६२.३२ कोटी प्रती वर्ष एवढा खर्च होतो. पाणी पुरवठा योजनांच्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीपोटी होणा-या एकुण खर्चाच्या हा खर्च सुमारे ४५% एवढा आहे. वीज वितरण कंपनीने वेळोवेळी लागू केलेल्या वाढीव वीज दरांमुळे योजनेच्या दैनंदिन परिचालन खर्चात वाढ होते. यासाठी विद्युत कार्यक्षम उपकरणे उभारणेबरोबर अपारंपारिक ऊर्जा निर्मितीचा पर्याय वापरुन विद्युत खर्चात कपात करणे शक्य आहे.

**प्रस्तावित योजनांवारील वीज वापर :**

प्रस्तावित एकूण १४ पाणी पुरवठा केंद्र व एकूण १९ पाणी पुरवठा योजनांवरील वीज वापर सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे आहे.

**पाणी पुरवठा केंद्र**

| अनु क्र. | पाणी पुरवठा केंद्राचे नाव | जोडलेला वीज भार केडब्ल्यु | एकूण वार्षिक वीज खर्च (रु. कोटी) |
|---|---|---|---|
| १ | तिरोडा | ९० | ०.१५ |
| २ | गोंदिया | ५०० | १.२९ |
| ३ | बल्लारपूर | १२३१ | ०.८० |
| ४ | चिखलदरा | ६१ | ०.०९ |
| ५ | १५६ गावे | १२० | ०.०८ |
| ६ | आकोट | १६० | ०.४३ |
| ७ | पातूर | ५० | ०.१६ |
| ८ | खामगाव | २४५ | ०.७९ |
| ९ | जळगाव जामोद | १३ | ०.०२ |
| १० | कारंजा | ३८ | ०.८७ |
| ११ | डिफेन्स | ३७० | १.३२ |
| १२ | इगतपुरी | २० | ०.०६ |
| १३ | पन्हाळा | ४५ | ०.२९ |
| १४ | लष्कर | ४५० | ३.९८ |
| | एकूण | ३३९३ केडब्ल्यु | रु १०.३५ कोटी |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

वरिल सर्व पाणी पुरवठा केंद्रावरील वार्षिक वीज खर्च रु १०.३५ कोटी आहे. एकत्रीत सौर उर्जा प्रकल्पांची क्षमता ही साधारणपणे २१८५ केडब्ल्युपी असून या प्रकल्पांची एकत्रीत किंमत अंदाजे रु. १७.०३ कोटी आहे. सदर सौर उर्जा प्रकल्पातून वार्षिक अंदाजे ३७.५५ लक्ष युनीट एवढी वीज निर्मिती होऊन रु.२.०६ कोटी वार्षिक बचत होऊ शकते. खर्चाची परतफेड ही अंदाजे ८ ते ९ वर्षात होऊ शकेल.

**पाणी पुरवठा योजना**

| अनु क्र. | पाणी पुरवठा योजनेचे नाव | जोडलेला वीज भार केडब्ल्यु | एकूण वार्षिक वीज खर्च (रु. कोटी) |
|---|---|---|---|
| १ | गोरेगाव | ६० | ०.१२ |
| २ | अहेरी | ४५ | ०.१० |
| ३ | पिंपरी मेघे | ५२२ | १.६५ |
| ४ | आर्वि | २३८ | ०.४१ |
| ५ | १०५ गावे | ६०८ | ०.५४ |
| ६ | मालपठार | ४० | ०.२ |
| ७ | लांघापूर | २३७ | ०.६९ |
| ८ | मानोरा व २५ गावे | १४८ | ०.६८ |
| ९ | ओझर साकोरे | ६५ | १.०२ |
| १० | चांदवड | १५ | १.४३ |
| ११ | नायगाव | २५ | ०.२६ |
| १२ | दहीवळ | ६० | १.०७ |
| १३ | माळमाथा | ५० | ०.१२ |
| १४ | तानंग | १५ | ०.२७ |
| १५ | हातकणंगले | ९० | ०.२६ |
| १६ | गांधीनगर | २५० | २.९९ |
| १७ | टोप | ७० | ०.२८ |
| १८ | शिरभावी | १०३० | २.७६ |
| १९ | चाकन | १५० | १.२६ |
| एकूण | | ३७७३ केडब्ल्यु | रु १६.११ कोटी |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

वरिल सर्व पाणी पुरवठा योजनांवरील वार्षिक वीज खर्च रु १६.११ कोटी आहे. एकत्रीत सौर उर्जा प्रकल्पांची क्षमता ही साधारणपणे २७२२ केडब्ल्युपी असून या प्रकल्पांची एकत्रीत किंमत अंदाजे रु.१८.३३ कोटी आहे. सदर सौर उर्जा प्रकल्पातून वार्षिक अंदाजे ४५.८४ लक्ष युनीट एवढी वीज निर्मिती होऊन रु.२.५२ कोटी वार्षिक बचत होऊ शकते. खर्चाची परतफेड ही अंदाजे ७ ते ८ वर्षात होऊ शकेल.

या आधारे वर उल्लेखित एकूण १४ पाणी पुरवठा केंद्र व एकूण १९ पाणी पुरवठा योजनांकरीता सौर उर्जा प्रकल्प संकल्पीत करणे, सौर उर्जा प्रकल्प राबवणे हे काम महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था ,मेडा किंवा ई.ई.एस.एल.मार्फत करणे योग्य आहे.

प्रस्तावित सौर उर्जा प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मेडा संस्थेची नेमणूक करणे बाबतचा प्रस्ताव :

राज्यामध्ये सौर उर्जा प्रकल्प संकल्पीत करणे, सौर उर्जा प्रकल्प राबवणे इत्यादी कामांसाठी मेडा (Maharashtra Energy Development Agency) ही महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाची अंगीकृत संस्था आहे. या संस्थेद्वारे अपारंपारिक उर्जा प्रकल्प राबविणे व त्या अनुषंगाने उर्जा संवर्धन करणे इत्यादी कामे राज्य शासन व केंद्र शासनाच्या वतीने केली जातात. यास्तंव विषयांकित कामासाठी प्रकल्प सेवा सल्लागार म्हणून मेडा या शासनाच्या अंगीकृत संस्थेची नेमणूक करणे प्रस्तावित असून तसा प्रस्ताव मा.संचालक मंडळा समोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत दैनंदिन देखभाल दुरुस्ती करण्यात येत असलेल्या वेण्णा पाणी पूरवठा केंद्रसहीत एकूण १४ पाणी पुरवठा केंद्रांवर व नागपूर पेरी अर्बन या पाणी पूरवठा योजनेसहित एकूण १९ पाणी पुरवठा योजनांवर सौर उर्जा प्रकल्प राबविण्यासाठी, प्रकल्प सल्लागार म्हणून मेडा संस्थेची नेमणूक करणे व त्यासाठी शुल्क मेडा संस्थेस अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे. याबाबत पुढील आवश्यक बाबींची कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिव म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र ५ : मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्षामध्ये सनियंत्रण व मुल्यमापन कक्ष (Monitoring & Evaluation Cell) स्थापन करण्याबाबत.**

सदर प्रस्तावाबाबत कार्यक्रम बाबीनुसार, सदस्य सचिव, मजीप्रा यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले. मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्षाकडे सद्य:स्थितीत केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत योजनांचे संनियंत्रण, विविध कार्यक्रमांतर्गत नागरी पाणी पुरवठा योजनांची तपासणी, घनकचरा व्यवस्थापन स्वच्छता अभियानांतर्गत, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत तसेच जलस्वराज्य-२ अभियानांतर्गत योजनांचे संनियंत्रण, राज्यस्तरीय तांत्रिक समिती तसेच इतर योजनांच्या आढावा बैठकींसाठी पीपीटी सादरीकरण इ. विविध क्षेत्रिय कार्यालयांकडून ईमेलव्दारे/दूरध्वनीव्दारे माहिती संकलन करणे, इ. कार्यभार आहे.

सदर कामकाज सुरळीतपणे पार पाडून विविध योजनांची माहिती शासन स्तरावरील विविध बैठकीत सक्षमपणेसादर करण्यासाठी मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्षामध्ये संनियंत्रण व मुल्यमापन कक्ष (Monitoring & Evaluation Cell) स्थापन करणे आवश्यक आहे. तसेच सदर कक्षामध्ये १ संनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ आणि २ सहाय्यक संनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ यांची २ वर्षासाठी करार पध्दतीने नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु सदर कामे शासन धोरणानुसार बाह्ययंत्रणेव्दारे (Out sourcing) करणेबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली.

त्यानुसार खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

- मध्यवर्ती नियोजन त्रण कक्षामध्ये संनियंत्रण व मुल्यमापन कक्षसंकल्पचित्र व संनियं ,(Monitoring & Evaluation Cell) स्थापन करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

- सदर कक्षामध्ये १ संनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ आणि २ सहाय्यक संनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ यांची २ वर्षासाठी बाह्ययंत्रनेव्दारे (Out sourcing) नेमणूक करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

- संनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ आणि सहाय्यक संनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या, शैक्षणिक अर्हता व अनुभव तसेच वेतन वगळता इतर सेवाशर्ती इ. कार्यक्रम बाबीसोबतच्या Annexure-A मध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच शासन निर्णय क्र.जस्वप्र.०११४/प्र.क्र.-०५/पापु-११, दि.६.२.२०१४ मधील तरतुदींच्या धर्तीवर ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

वरीलप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

# ANNEXURE - A

| Sr. No. | Name of post | Minimum Required qualification | Minimum required experience |
|---|---|---|---|
| 1 | M & E Specialist | B.Tech./B.E.(IT/CS) / M.C.A. or M.C.S. or M.C.M. or M.Sc. (Stat.) or an equivalent qualification from a recognized university with sound knowledge of computer IT systems. | 5 years |
| 2 | Asstt. M & E Specialist | B.Tech./B.E.(IT/CS) / or M.C.A. or M.C.S. or M.C.M. or M.Sc. (Stat.) or an equivalent qualification from a recognized university with sound knowledge of computer IT systems. | 3 years |

| Sr. No. | Name of Post | Pay Scale |
|---|---|---|
| 1 | M & E Specialist | Rs.65,000/-Per Month |
| 2 | Assistant M.&.E | Rs.40,000/- Per Month |

| Sr.No. | Position | Roles and Responsibility |
|---|---|---|
| 1 | M & E specialists | ) To check the data collected from field offices<br>2) To check progress of schemes/programme<br>3) To finalize the progress report submitted by field officers after removing all errors/ inaccuracies<br>4) To identify the schemes which are running behind their schedules and submit the report to authorities<br>5) To identify the scheme which require severe intervention for timely completion of schemes<br>6) to identify the department where written communication needs to be done to remove the hurdles if any<br>7) To check the expenditure as per planned schedule of works.<br>8) To generate the reports as per requirements<br>9) To present the presentations as per requirement of department/organizations<br>10) To prepare the graphs of the reports generated for various |

Education qualification (lala)

| | | |
|---|---|---|
| | | programme/divisions/circles<br>11)To assess the performance of programme/officers and report to the authority.<br>12) To assess the information system and suggest the measures required to improve the same<br>13) To trigger the various issues (red flags) in schemes and report to authority<br>14) To generate the letters to the concerned based on the issues/performances of the scheme/personnel<br>15)To suggest the software and hardware requirements of system<br>16) To liaison with the various field officers about the progress etc. |
| 2 | Assistant Monitoring and Evaluation Specialist | 1) To collect the data from the field officers.<br>2) To check/validate the data and its accuracy<br>3) To check the progress of scheme with their previous months.<br>4) To communicate with the field officers.<br>5) To prepare the draft progress report in the excel/software available with the department.<br>6) To check the progress of scheme with their scheduled time lines.<br>7) To check the expenditure of schemes and work out the physical and financial progress.<br>8) To prepare the various reports based on baseline data collected from field.<br>9) To help in assessing the type of information system that is in place & aggregate data and mechanisms to improve the same<br>10)To assist in assessing the reports arrangements existing at field offices, quality of reporting, mechanism to improve the same and suggests what decision can be triggered using the report.<br>11)To assist the designing a system for accurately monitoring and evaluating the programme in light of programme results frame work and achievement.<br>12)To assist in developing a system to |

82

| | | |
|---|---|---|
| | | collect information, analyse the information generated and to generate progress reports for enabling timely decision making<br>13) To develop a system for periodic internal and external evaluation of various components of programme & to disseminate the results of same to all stake holders with corrective measures wherever necessary<br>14)To generate programme information management report<br>15)To assist in developing easy to use and simple M & E system<br>16)To generate and submit various reports as per requirement to WSSD/UD etc. from time to time<br>17)To prepare the power point presentations as per requirement<br>18)To assist in identifying software and hardware requirements for M & E systems. |

Education qualification (lala)

**कार्यक्रम बाब क्रमांक ६ :** म.जी.प्रा.तील रिक्त असलेले कायदा व कामगार अधिकारी हे पद करार पध्दतीने खुल्या बाजरातून भरणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास अवगत केले की, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळातील कायदे विषयक कामकाज हाताळण्यासाठी "कायदा अधिकारी" हे पद निर्माण करणेबाबत व सदस्य सचिव यांनी त्यास शासनाची मान्यता घेणेच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणेबाबतच्या ठरावास दि.२०.०३.१९७९ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव संमत करण्यात आला. त्या अनुषंगाने शासन निर्णय, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, दि. ७.३.१९८१ अन्वये "कायदा व कामगार अधिकारी "हे पद निर्माण करण्यात आले.

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयातील कायदा व कामगार अधिकारी या पदावर कार्यरत असलेले श्री.भातखंडे हे दिनांक ३०.०४.२०१७ रोजी नियत वयोमाना नुसार सेवानिवृत्त झाल्याने १ वर्षापासून "कायदा व कामगार अधिकारी " हे पद रिक्त आहे.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये "कायदा व कामगार अधिकारी" या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये प्राधिकरणाशी संबंधीत विविध न्यायालयातील प्रकरणांवर नियंत्रण ठेवणे, पॅनेल वकिलांच्या संपर्कात राहून मुदतवाढ, शपथपत्र दाखल होतील याबाबत दक्षता घेणे, पाणीपुरवठा योजनासंबंधात त्रिपक्षीय करार करणे इ. बाबींचा समावेश आहे.

४. शासनाच्या गृहविभागाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयामध्ये "कायदा व कामगार अधिकारी" हे पद कंत्राटी पध्दतीने भरणे बाबातचा निर्णय दि.१५.९.२००६ च्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे. त्याच प्रमाणे शासनाच्या महसूल व वनविभागाने विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयात "कायदा व कामगार अधिकारी" हे पद निर्माण करणेचा निर्णय शासन निर्णय दि.६.४.२०११ व दि. ३०.७.२०११ अन्वये घेतलेला आहे. या अनुषंगाने शासनाच्या विधी व न्याय विभागाने दि.६.३.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, कायदा व कामगार अधिकारी हे भरणेसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कायदा व कामगार अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने भरण्याचे प्रस्तावित आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

५. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कामकाजाचे स्वरुप पाहता "कायदा व कामगार अधिकारी" हे पद कंत्राटी पध्दतीने भरणेसाठी खालील निकष प्रस्तावित आहेत.

१. **शैक्षणिक अर्हता**-मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या विधी शाखेचा पदवीधर.

२. **वय**-नेमणूकीच्या वेळी ३५ वर्षापेक्षा कमी आणि ६० वर्षापेक्षा अधिक नसावे.

३. **अनुभव**-मा.उच्च न्यायालय किवा दुय्यम न्यायालयातील किमान ७ वर्षाचा अनुभव असलेले बार कौन्सिलचे प्रमाणपत्र.

तसेच प्राधिकरणाशी संबधीत खालील कायद्यांची पुर्ण माहिती असावी.

१. महाराष्ट्र शासनाचे सर्व सेवा विषयक नियम
२. भाडे पटटा करार
३. कामगार व औद्योगिक कायदा
४. भूसंपादन कायदा
५. करार कायदा
६. लवाद कायदा
४. मराठी,इंग्रजी व हिंदी भाषेचे ज्ञान असावे.
५. मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत भाषातंर करण्याची क्षमता असावी.
६. संगणकाचे व्यावहारीक ज्ञान असावे.

**निवडीची प्रकिया :**

कायदा व कामगार अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने खुल्या बाजारातून भरणेसाठी, मराठी व इंग्रजी वर्तमान पत्रामध्ये तसेच प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर जाहिरात देऊन अर्ज मागविणेत यावेत. सदर अर्जाची छाननी करुन निवड समिती मार्फत उमेदवाराची निवड अंतिम केली जाईल.

**निवड समितीची रचना :-**

१. सदस्य सचिव म.जी.प्रा.- : अध्यक्ष
२. मुख्य अभियंता दर्जाचे अधिकारी : सदस्य
३. मुख्य प्रशासकीय अधिकारी : सदस्य
४. मा.उच्च न्यायालयातील प्राधिकरणाच्या पॅनलवरील वकिल : सदस्य
प्राधिकरणातील उपलब्ध अभियंता व पॅनल वकिल यांच्या मधून सदस्य निवडीचे अधिकार सदस्य सचिवांना राहतील.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**<u>कालावधी :</u>**

शासनाचे महसूल व वनविभाग तसेच गृहविभाग यांनी निश्चित केलेल्या अटीनुसार म.जी.प्रा.मध्ये कंत्राटी पध्दतीने दिलेली नियुक्ती ही प्रथम ११ महिन्यांसाठी असेल. त्यानंतर आवश्यकते व कामाच्या मूल्यमापना नुसार एक आठवडयाचा खंड देऊन, त्यापुढे याच प्रकारे केवळ दोन वेळा प्रत्येकी ११ महिन्यांची मुदतवाढ संबधीत उमेदवारास देण्यात येईल. त्यांनतर मात्र मुदतवाढ न देता पुन्हा नव्याने निवडीची प्रकिया राबविण्यात येईल.

**<u>वेतन व भत्ते:</u>**

कायदा व कामगार अधिकारी या पदावरील खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या केलेल्या उमेदवारास भत्त्यासहित एकत्रित एकुण मासिक मानधन रु.५०,०००/- (मानधन ४५,०००/- व प्रवासभत्ता रु.५०००/-) इतके देणेचे प्रस्तावित आहे. मुंबई क्षेत्राबाहेर न्यायालयीन कामकाजाच्या अनुषंगाने प्रवास करावा लागल्यास गट "ब" मधील अधिका-यास अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता व दैनिक भत्ता रक्कम देय राहील.

कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवाराला मानधना पोटी व प्रवास भत्त्यापोटी होणारा खर्च "कार्यालयीन खर्च " या शिर्षाखाली दर्शविण्यात येईल. त्यानुसार खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**<u>ठराव:</u>**

असा ठराव करणेत येतो कि,महाराष्ट्र शासनाच्या महसूल,वन विभाग तसेच गृह विभागाच्या धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये "कायदा व कामगार अधिकारी" हे पद कंत्राटी पध्दतीने भरणेस मान्यता देणेत येत आहे.तथापि,सदर पदावरील पदाची प्रथम नियुक्ती ११ महिन्यांकरीता द्यावयाची असून त्यानंतर एक आठवडयाचा खंड देऊन,त्यापुढे याच पध्दतीने दोन वेळा प्रत्येकी ११ महिन्यांची मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.सदर पदासाठी भत्त्यासहित एकुण एकत्रित मासिक मानधन रु.५०,०००/- (मानधन रु.४५,०००/- + प्रवास भत्ता रु.५,०००/-) इतके देय राहिल. तसेच न्यायालयीन कामासाठी मुंबई क्षेत्राबाहेर प्रवास करावा लागल्यास शासनाच्या गट" ब" मधील अधिका-यास देय असणारे दैनिक भत्ते व प्रवासभत्ते देय राहतील. सदर कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यास मान्यता देणेत येत आहे.

याबाबत सदस्य सचिव यांनी पुढील कार्यवाही करावी.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.७: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन / डोंगराळ ,योजना मधून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराचा आढावा व सुधारित दरांस मंजूरी.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मा.सदस्य सचिवयांनी ९ पाणी पुरवठा केंद्रातील सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठी पाण्याच्या दरामध्ये वाढ ही जास्तीत जास्त ५०% पर्यंत मर्यादीत करण्याचा प्रस्ताव मा. संचालक मंडळा समोर सादर केला होता. सदर प्रस्तावावर म.जी.प्रा. च्या मा. संचालक मंडळाची चर्चा केल्यानंतर त्यांनी पाणी पुरवठा केंद्रातील सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठी पाणी पुरवठा दरामध्ये वाढ ही 30% पर्यंत सिमित करण्यास मान्यता दिली.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**ठराव -:** असा ठराव करण्यात येतो की ,

१) १९ पाणी पुरवठा केंद्रातील सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठी दि. १ जुलै, २०१५ च्या पाण्याच्या दरामध्ये वाढ ही जास्तीत जास्त ३०% पर्यंत मर्यादीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
सदर प्रस्तावास मान्यता दिल्याने १९ पाणी पूरवठा केंद्रांच्या दरामध्ये वाढ ही ३० % पर्यंत सिमित करण्यास व सदर सुधारीत दर १ जुलै, २०१८ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) १ जुलै, २०१८ च्या अधिसूचनेमध्ये किमान आकारणीचा समावेश केला नसल्याने त्याचा समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : औरंगाबाद गारखेडा येथील मजीप्राच्या मालकीच्या जागेत सुसज्य प्रशासकीय इमारत बांधणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारीतील गारखेडा औरंगाबाद येथील नगर भूमापन क्र.१५३३१ या भूखंडाचा स्वनिधीतुन विकास करणे प्रस्तावित आहे. या भूखंडाचे क्षेत्रफळ ६६३३.९० चौ.मी. आहे.

सदरची जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे ज्ञापन क्र.जमीन ३९८९/३०५९/प्र.क्र.६/८९/ज-७ दि.१४.२.१९९० अन्वये रितसर देण्यात आलेली आहेत. सदरच्या जागेच्या आखिव पत्रिकेवर (पी.आर.कार्डावर) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचे नांव आहे. सदरच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ ६६३३.९. चौ.मी. पैकी ३६२ चौ.मी. जागेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे विश्रामगृहाचे बांधकाम झालेले आहे. या विश्रामगृहामध्ये सद्यस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दोन कार्यालय कार्यरत आहेत. सदर मजीप्राच्या जागेवर संरक्षण भिंतीचे काम पुर्वीच झालेले आहे.

औरंगाबाद येथे प्राधिकरणाची मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप विभागीय अभियंता यांची कार्यालये आहेत.

औरंगाबाद येथील प्राधिकरणाच्या सर्व कार्यालयांना प्राधिकरणाच्या मालकीच्या एका सुसज्ज प्रशासकीय इमारतीत एकत्रित केल्यास कामकाजाच्या व प्रशासनाच्या दृष्टीकोनातून अत्यंत सोयीचे व उपयुक्त होणार आहे. वरील नमुद केलेल्या सर्व जागापैकी सुसज्ज प्रशासकीय इमारतीसाठी गारखेडा येथील जागा योग्य आहे. सदरची जागा सिडको बस स्टॅन्ड पासून तीन मिलोमीटर अंतरावर असून हेगडेवार हॉस्पीटल जवळ असून मोक्याचे ठिकाणी आहे. वरील सर्व कार्यालये एकत्रित करणेसाठी कार्यालयाची रचना क्षेत्रफळासह खालील प्रमाणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | मजला | कार्यालयाचे नांव | प्रस्तावित चटईक्षेत्र , Sq.m | प्रत्यक्षात बिल्टअप क्षेत्र, Builtup Area in Sq.m |
|---|---|---|---|---|
| १. | तळमजला | अधीक्षक अभियंता कार्यालय | ५०५ यात पार्कींग जागेचा समावेश आहे. | ८४८.७२ |
| २. | पहिला मजला | मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता, गुणवत्ता पथक | ७१६ | ८१०.६९ |
| ३. | दुसरा मजला | कार्यकारी अभियंता व २ उप विभाग. | ६६० | ८२९.३६ |
| | | **एकूण** | **१८८१** | **२४८८.७७** |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

वरिल सर्व कार्यालयांचे एकुण चटई क्षेत्र १८८१ चौ.मी. इतके प्रस्तावित आहे.

प्रस्तावित प्रशासकीय इमारतीसाठी २४८८.११ चौ.मी. बिल्टअप क्षेत्राकरिता अंदाजित किंमत ६८६.६२ लक्ष आहे. त्यामुळे सदर इमारतीचे बांधकाम रुपये २६,८६६ प्रती चौ.मी. (म्हणजे रु.२५०० प्रति चौ.फुट) या दराने होणार आहे. या किंमतीत २४.५% इतर बाबीचा (उदाहरणार्थ, विद्युतीकरण, फर्निचर व अंतर्गत सजावट, सल्लागार फी, अग्नि प्रतीबंधक व लँड सजावट इ.) समावेश आहे.

वरील कामासाठी विकास योजना नियमावलीचा अभ्यास करुन जागेचे सुयोग्य नियोजन करण्यासाठी वास्तुविशारदाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्याकरिता अनुभवी व नामांकित वास्तुविशारदाची नेमणूक स्पर्धात्मक रितीने करुन त्याच्याकडून इमारतीचे आराखडे व नकाशे तयार करुन घेणे प्रस्तावित आहे.

**प्रस्ताव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सहा प्रादेशिक विभाग असुन, औरंगाबाद प्रादेशिक विभाग वगळून इतर पाचही प्रादेशिक विभागांना प्राधिकरणाच्या मालकीची सुसज्ज प्रशासकीय इमारत आहे. तसेच औरंगाबाद येथील प्राधिकरणाची कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत आहेत. सदरचे सर्व कार्यालये एकत्रित/एकाच प्रस्तावित इमारतीत आणल्यास कामकाजाच्या व प्रशासकीय दृष्टीकोनातुन अत्यंत सोयीचे व उपयुक्त होणार आहे. या सुसज्ज इमारतीसाठी प्राधिकरणाच्या मालकीची गारखेडा औरंगाबाद येथील जागा मोक्याच्या ठिकाणी व सुविधायुक्त असल्याने याच ठिकाणी सुसज्य प्रशासकीय इमारत बांधणे योग्य होणार आहे. तसेच या इमारतीचे सुयोग्य नियोजनासाठी अनुभवी व नामांकित वास्तुविशारदाची नेमणूक करणे योग्य होणार आहे.

तरी प्राधिकरणाचे स्वत:च्या निधीतुन औरंगाबाद गारखेडा येथे मजीप्राच्या मालकीच्या जागेवर **सुसज्य** प्रशासकीय इमारत बांधणेसाठी व त्यासाठी वास्तुविशारद नेमण्याकरिता सदर कार्यक्रम बाब सादर करण्यात आलेली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून औरंगाबाद गारखेडा येथील प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेत सुसज्य प्रशासकीय इमारत बांधणे व त्यासाठी अनुभवी व नामांकित वास्तुविशारद नेमण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. या कार्यवाहीकरिता मा.सदस्य सचिव म.जी.प्रा., मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ९ : न्हावा-शेवा पाणी पुरवठा केंद्रांतर्गत वायाळ येथील उदंचन केंद्रावरील आवश्यक असणारा वीज पुरवठा अखंडीत व सुरळीत उपलब्ध होण्यासाठी वीज मंडळाच्या भोकरपाडा वीज केंद्रापासून वायाळ येथील उदंचन केंद्रापर्यंत वीज वाहिनी अंथरणे.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले की, मुंबई शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सन १९७० साली सिडकोची स्थापना करुन नवी मुंबई परिसरात सिडको वसाहती निर्माण करण्यात आल्या. तसेच उरण तालुक्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्याधुनिक न्हावा-शेवा बंदराची निर्मिती करण्यात आली. या सिडको वसाहतीकरीता तसेच जवाहरलाल नेहरु बंदर, उरण करीता आवश्यक असलेल्या पाण्याची गरज भागविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि.१७.४.१९८६ च्या शासन निर्णयानुसार पाणी पुरवठा योजनेस प्रशासकिय मान्यता दिली होती. सदरची योजना मार्च १९८९ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच सिडको वसाहतीच्या वाढीव ५०.०० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठयाची गरज भागविण्यासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना पुर्ण ठेव तत्वावर राबवून डिसेंबर १९९३ पासून कार्यान्वित करण्यात आली.

या योजनेचा उदभव हा पाताळगंगा नदी असून, टाटा जलविद्युत केंद्र अवजल पाताळगंगा नदीतून वायाळ येथे बांधलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यात पाणी साठवून ते भोकरपाडा येथील १००.०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या पारंपारिक पध्दतीच्या जलशुध्दीकरण केंद्रातील प्रक्रियेनंतर वितरीत करण्यात येते. या योजनेतील अंथरलेल्या जलवाहिन्या या मृदूपोलादी असून त्या अति जीर्ण झाल्या असल्याने यातून वारंवार मोठया प्रमाणात पाण्याची गळती होते. तसेच यावर उभारलेली यंत्रसामुग्रीला सुध्दा सुमारे ३० वर्षे झाली असून ही यंत्रसामुग्रीही वारंवार ना-दुरुस्त होते. या ठिकाणी योजनेच्या सुरुवातीपासून पुरविण्यात आलेला वीज पुरवठा हा वीज वितरण कंपनीच्या पाताळगंगा व खालापूर येथील विद्युत उपकेंद्रातून पुरवठा करण्यात आला असून या वीज वाहिन्याही सुमारे ३० वर्षापूर्वीच्या आहेत. या वीज वाहिन्याही जीर्ण झाल्या असून यावर वारंवार दुरुस्ती उदभवते. विद्युत पुरवठया अभावी वायाळ उदंचन केंद्रातून उपसा करण्यात येणा-या पाण्याचे प्रमाण घटते व परिणामी शहरातील नागरीकांना अत्यल्प प्रमाणात पाणी पुरवठा होतो.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**प्रस्तावित न्हावा-शेवा वाढीव पाणी पुरवठा योजना टप्पा-३ :**

वरील परिस्थितीवर मात करण्यासाठी व नागरीकांची वाढीव गरज लक्षात घेऊन २२८ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची पाणी पुरवठा योजना प्रस्तावीत असून या योजनेला तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या योजनेला प्रशासकिय मान्यता प्रदान करावयाची कार्यवाही सुरु असून लवकरच मान्यता प्राप्त होण्याची शक्यता आहे. या योजनेमध्ये उदभव शिर्षकामे, उर्ध्ववाहिनी, जलशुध्दीकरण केंद्र, प्रकिया पूर्व व शुध्द पाण्याची यंत्रसामुग्री, गुरुत्ववाहिन्या, वीज मंडळाच्या भोकरपाडा वीज केंद्रापासून वायाळ येथील उदंचन केंद्रापर्यंत वीज वाहिनी अंथरणे इ. कामांचा समावेश आहे.

**मा.संचालक मंडळासमोर सादर प्रस्ताव :**

वायाळ उदंचन केंद्राच्या ठिकाणी होणा-या अनियमित विद्युत पुरवठयामुळे वायाळ उदंचन केंद्रातून उपसा करण्यात येणा-या पाण्याचे प्रमाण घटते व परिणामी शहरातील नागरीकांना अत्यल्प प्रमाणात पाणी पुरवठा होतो. यामुळे उदभवणारा जनक्षोभ टाळण्यासाठी तसेच काही वेळा उदभवणा-या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी वीज वितरण कंपनीकडे संपर्क साधण्यात आला असून त्यांनी वीज मंडळाच्या भोकरपाडा येथील विद्युत उपकेंद्रातून वायाळ येथील उदंचन केंद्रापर्यत सुमारे ७ कि.मी. लांबीची नवीन वीज वाहिनी अंथरण्याचा प्रस्ताव दिला आहे. या प्रस्तावातील निविदेची किंमत रु ३.८१ कोटी (जीएसटी वगळून ) व रु.४.२६ कोटी (जीएसटीसह) एवढी आहे. या खेरीज हे काम पूर्ण होण्यासाठी पुढीलप्रमाणे काही अधिक निधीची गरज लागणार आहे. हा प्रस्ताव प्रस्तावित न्हावा-शेवा वाढीव पाणी पुरवठा योजना टप्पा-३ मध्ये समाविष्ट आहे

| | |
|---|---|
| कामाची किंमत | रु.३८१ लक्ष (जीएसटी वगळून ) |
| कामाची किंमत | रु.४२६ लक्ष (जीएसटीसह) |
| वीज मंडळाची पर्यवेक्षणाची रक्कम | रु.४.९८ लक्ष |
| विद्युत निरिक्षकाची पहाणी फी | रु.०.५ लक्ष (अपेक्षित) |
| विविध प्राधिका-यांकडे भरावयाची रक्कम (बांधकाम विभाग इ.) | रु.२५.०० लक्ष ( अपेक्षित) |
| एकुण | रु.४५६.४८ लक्ष |
| | म्हणजेच सुमारे रु.४५७ लक्ष |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

वर उल्लेख केलेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी वीज मंडळाच्या भोकरपाडा येथील विद्युत उपकेंद्रातून वायाळ येथील उदंचन केंद्रापर्यत नवीन वीज वाहिनी अंथरण्याचे काम तातडीने हाती घेणे आवश्यक आहे. प्रस्तावित २२८ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या योजनेला प्रशासकिय मान्यता प्राप्त होताच या कामासाठी घसारा निधीतून झालेला खर्च प्रस्तावीत योजनेवर समायोजित करण्यात येईल. त्यामुळे घसारा निधीच्या संचीत रक्कमेवर परिणाम होणार नाही. यास्तव सदरचे काम घसारा रक्कमेतून करण्यास मान्यता मिळण्याची बाब मा.संचालक मंडळासमोर सादर करण्यात आली आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**ठराव :**

न्हावा-शेवा पाणी पुरवठा केंद्राच्या वायाळ येथील उदंचन केंद्राच्या ठिकाणी सध्या वारंवार होत असलेल्या खंडीत व अनियमित वीज पुरवठयावर मात करण्यासाठी वीज मंडळाच्या भोकरपाडा येथील विद्युत उपकेंद्रातून वायाळ येथील उदंचन केंद्रापर्यत नवीन वीज वाहिनी अंथरण्याचे काम तातडीने हाती घेण्याच्या प्रस्तावास पुढील शर्तीच्या अधिन राहून मान्यता प्रदान कण्यात येत आहे.

१. सदरच्या कामासाठी होणारा खर्च हा सध्या घसारा निधीतून करण्यात यावा.

२. न्हावा-शेवा वाढीव पाणी पुरवठा योजना टप्पा-३ योजनेस मान्यता प्राप्त होताच हा खर्च या योजनेवर समायोजित करण्यात यावा.

वरील बाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१० : औरंगाबाद गारखेडा येथील मजीप्राच्या मालकीच्या जागेत सुसज्ज विश्रामगृह इमारत बांधणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारीतील गारखेडा औरंगाबाद येथील नगर भूमापन क्र.१५३३१ या भूखंडाचा स्वनिधीतुन विकास करणे प्रस्तावित आहे. या भूखंडाचे क्षेत्रफळ ६६३३.९० चौ.मी. आहे. सदर जागेवर संरक्षण भिंत आहे.

सदरची जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे ज्ञापन क्र.जमीन ३९८९/३०५९ /प्र.क्र.६/८९/ज-७ दि.१४.२.१९९० अन्वये रितसर देण्यात आलेली आहेत. सदरच्या जागेच्या आखिव पत्रिकेवर (पी.आर. कार्डावर) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचे नांव आहे. सदरच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ ६६३३.९०चौ.मी. पैकी ३६२ चौ.मी. जागेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे विश्रामगृहाचे बांधकाम झालेले आहे. या विश्रामगृहामध्ये सद्यस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दोन कार्यालय कार्यरत आहेत. हे विश्रामगृह जुने असुन संरचनात्मक लेखा परिक्षण (structural Audit) केल्यावर ही इमारत वापरणे योग्य नाही असा निष्कर्ष दिला आहे.

औरंगाबाद येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची विविध कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत आहेत.

गारखेडा औरंगाबाद येथे प्राधिकरणाच्या सर्व कार्यालयांना प्राधिकरणाच्या मालकीच्या एक सुसज्ज प्रशासकीय इमारत बांधून स्थलांतरीत करणे विचाराधीन आहे. त्यामुळे प्रशासकीय इमारत सोबतच कामकाजाच्या व प्रशासकीय दृष्टीकोनातुन याच परिसरात एक सुसज्ज विश्रामगृह बांधणे योग्य होणार आहे. या विश्रामगृहाची रचना क्षेत्रफळासह खालील प्रमाणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | मजला | नियोजित वापर | प्रस्तावित बिल्टअप क्षेत्र, Builtup Area in Sq.m |
|---|---|---|---|
| १. | तळमजला + पहिला मजला | लॉबी, सभागृह , साधे पाच सुट,भोजन कक्ष व भांडार, टेरेस , २ व्हीआयपी सुट इ. | **६६१.५८** |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रस्तावित विश्रामगृहासाठी ६६१.५८ चौ.मी. बिल्टअप क्षेत्राकरिता अंदाजित किंमत २१६.३३ लक्ष आहे. त्यामुळे सदर इमारतीचे बांधकाम रुपये ३२६९८ प्रती चौ.मी. (म्हणजे रु.३०४० प्रति चौ.फुट) या दराने होणार आहे. या किंमतीत २०.५% इतर बाबीचा (उदाहरणार्थ, विद्युतीकरण, फर्निचर व अंतर्गत सजावट, सल्लागार फी, व आकस्मीक खर्च, इ.) समावेश आहे.

वरील कामासाठी विकास योजना नियमावलीचा अभ्यास करुन विश्रामगृहाचे सुयोग्य नियोजन करण्यासाठी वास्तुविशारदाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्याकरिता अनुभवी व नामांकित वास्तुविशारदाची नेमणूक स्पर्धात्मक रितीने करुन त्याच्याकडून इमारतीचे आराखडे व नकाशे तयार करुन घेणे प्रस्तावित आहे.

**<u>प्रस्ताव :-</u>**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण औरंगाबाद प्रादेशिक विभागासाठी गारखेडा औरंगाबाद येथे प्राधिकरणाच्या मालकीची सुसज्ज इमारत स्वनिधीतून प्रस्तावित आहे. या प्रस्तावित इमारतीत औरंगाबाद येथील वेगवेगळया ठिकाणी कार्यरत सर्व कार्यालयाचे एकत्रीकरण करण्याचेही प्रस्तावित आहे. त्यामुळे कामकाजाच्या व प्रशासकीय दृष्टीकोनातुन या परिसरात सुसज्ज विश्रामगृह बांधणे योग्य होणार आहे. तसेच या विश्रामगृहाचे सुयोग्य नियोजनासाठी अनुभवी व नामांकित वास्तुविशारदाची नेमणूक करणे योग्य होणार आहे.

तरी प्राधिकरणाचे स्वत:च्या निधीतुन औरंगाबाद गारखेडा येथे मजीप्राच्या मालकीच्या जागेवर सुसज्ज विश्रामगृह बांधणेसाठी व त्यासाठी वास्तुविशारद नेमण्याकरिता ही कार्यक्रम बाब सादर करण्यात आलेली आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून औरंगाबाद गारखेडा येथील प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेत सुसज्ज विश्रामगृह बांधणे व त्यासाठी अनुभवी व नामांकित वास्तुविशारद नेमण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या कामासाठी रु.२.५ कोटी पेक्षा कमी किंमतीच्या निविदा प्राप्त झाल्यास त्याबाबत पुढील कार्यवाही सदस्य सचिव यांनी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.